| | | |
|---|---|---|
| | रावेत पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड<br>रावेत, पुणे दुरध्वनी क्रमांक ९११२६२०१००<br>**Email :- ravetpolice2719@gmail.com** | |

## प्रेसनोट

**रावेत पोलीस स्टेशन हद्दीतील पुनावळे येथे "रेड्डी आन्ना या नावाचे प्रतिबंधित केलेल्या ऑनलाईन बेंटीग/ गेंमिग ॲप व्दारे नागरीकांची फसवणुक करणाऱ्या टोळीवर" रावेत पोलीसांनी छापा मारुन १० आरोपीना अटक करुन, त्याच्याकडुन - ७,९८,१००/- रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

मा. पोलीस आयुक्त श्री. विनयकुमार चौबे साो., मा.सह-पोलीस आयुक्त श्री. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी साो, पोलीस उप आयुक्त परिमंडळ – १ श्रीमती. स्वप्ना गोरे मॅडम व सहा. पोलीस आयुक्त चिंचवड विभाग श्री. मुगूटलाल पाटील साो, यांनी पिंपरी चिंचवड आयुक्तालय हद्दीत कोठेही अवैध धंदे मिळुन आल्यास त्यावर तात्काळ कारवाई करणेबाबत वेळोवेळी आदेशीत केले आहे. त्याप्रमाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितीन फटांगरे यांनी अवैध धंदयावर कारवाई करणेबाबत वरीष्ठांच्या सुचनाप्रमाणे हद्दीत पेट्रोलिंग करुन असे प्रकार मिळुन आल्यास तात्काळ कारवाई करणेबाबत सुचना दिल्या आहेत.

त्याप्रमाणे दिनांक:- १०/११/२०२४ रोजी पोशि/२४८३ संदेश जाधव व पोशि/३२५५ कदम यांना दुपारी १४.०० वा ते २१.०० वाचे दरम्यान रावेत डायल-११२ चारचाकीवर कर्तव्य करीत असताना, पोशि/२४८३ संदेश जाधव गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, ॲडम व्हिले सोसायटी, फ्लॅट नंबर- १००२, गायकवाड नगर, पुनावळे, ता.मुळशी, जि.पुणे येथे अनाधिकृतपणे राहत असुन, ते ऑनलाईन अनाधिकृत गेमिंग ॲपव्दारे सट्टेबाजी चालु आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदर ठिकाणी सपोनि. संदीप देशमुख यांनी मा.वपोनि नितीन फटांगरे साो. यांना सांगितली असता, त्यांनी सदर ठिकाणी जावुन छापा मारुन कायदेशिर कार्यवाही करणेबाबत तोंडी आदेश दिल्याने सपोनि. संदीप देशमुख, सपोउपनि. कोळगे, पोशि/२४८६ संदेश जाधव, पोशि/३२५५ कदम, पोशि/२१६० तांबे व पोशि/२८८५ राणे असे लागलीच छाप्यासाठी लागणारे सर्व साहीत्य घेऊन जावुन सदर ठिकाणी छापा टाकला.

सदर छाप्यामध्ये आरोपी नामे – १) पियुष शेषनारायण सोनी, वय १९ वर्षे, व्यवसाय –काही नाही, २) मुनेश्वर चुरानंद देवागन, वय १९ वर्षे, व्यवसाय –काही नाही, ३) अजस अरुणकुमार सिन्हा, वय २४ वर्षे, व्यवसाय –काही नाही, ४) हेंमतकुमार नारायण ठाकुर, वय २५ वर्षे, व्यवसाय –काही नाही, ५) संजयमाणिक परदेशीमाणिक पुरी, वय १९ वर्षे, व्यवसाय –काही नाही, ६) हितेश पुनाराम देंवांगान, वय २७ वर्षे, व्यवसाय –काही नाही व ७) सागर अशोक गजभिर, वय २७ वर्षे, व्यवसाय –काही नाही, वरील सर्व सध्या रा. ॲडम व्हिले सोसायटी, फ्लॅट नंबर- १००२, गायकवाड नगर, पुनावळे, ता.मुळशी, जि.पुणे, मुळ रा. दुर्ग, छत्तीसगड व ८) अनिकेत हेंमत यादव, वय १९ वर्षे, व्यवसाय –काही नाही, सध्या रा. ॲडम व्हिले सोसायटी, फ्लॅट नंबर- १००२, गायकवाड नगर, पुनावळे, ता.मुळशी, जि.पुणे, मुळ रा. सिध्दकेला, जि. बलागिर, राज्य ओडीसा, ९) अक्षय अमीन अस्थाना, वय २७ वर्षे, व्यवसाय –काही नाही, सध्या रा. ॲडम व्हिले सोसायटी, फ्लॅट नंबर- १००२, गायकवाड नगर, पुनावळे, ता.मुळशी, जि.पुणे, मुळ रा. बस्तावली गांव, इंदीरानगर,लख्ननऊ, राज्य - उत्तरप्रदेश व १०) फुलेंद्र अशोकराय कुमार, वय २७ वर्षे, व्यवसाय –काही नाही, सध्या रा. ॲडम व्हिले सोसायटी, फ्लॅट नंबर- १००२, गायकवाड नगर, पुनावळे, ता.मुळशी, जि.पुणे, मुळ रा. भापटीया, सुपौल राज्य-बिहार यांना ताब्यात घेण्यात आले. सदर फ्लॅटची पाहणी केली असता, सदर फलॅट मध्ये ७,९८,१००/- रु. किंमतीचे ०५ लॅपटॉप, ३२ मोबाईल फोन, ०१ टॅब,०३ राऊटर, विविध बँकचे १२ पासबुक, ०२ चेकबुक , ४९ एटीएम कार्ड, २० विविध कंपन्याची सीमकार्ड असा मुद्देमाल मिळुन आला आहे. त्याबाबत रावेत पोलीस स्टेशन गुरनं. ४८६/२०२४ भारतीय न्याय संहिता सन -२०२३ चे कलम ३१८ (४),३३५, ३३६ (२), ३३६ (३) ३३८,३४०

(२), ६१ (२) सह महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४,५ सह माहिती तंत्रज्ञान कायदा २००० चे कलम ६६ (सी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन, करुन सदर इसमांना नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर आरोपी सध्या पोलीस कस्टडी मध्ये आहेत. सदर गुन्हयाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक - संदीप देशमुख, रावेत पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री. विनयकुमार चौबे सो., मा.सह-पोलीस आयुक्त श्री. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी सो, पोलीस उप आयुक्त परिमंडळ – १ श्रीमती. स्वप्ना गोरे मॅडम व सहा. पोलीस आयुक्त चिंचवड विभाग श्री. मुगूटलाल पाटील सो व वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन फटांगरे, रावेत पोलीस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि. संदीप देशमुख, सपोउपनि. कोळगे, पोशि/२४८६ संदेश जाधव, पोशि/३२५५ कदम, पोशि/२१६० तांबे व पोशि/२८८५ राणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली असुन, रावेत पोलीसांचे या कारवाईमुळे सर्व स्तरातुन कौतुक होत आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप-आयुक्त
परिमंडळ ०१, पिंपरी चिंचवड.